म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
सं. क्र. २२१८
REFBK-0021501
REFBK-0021501

सुयश प्रकाशन

*** आमची प्रकाशने ***

- **पाच तीन दोन**
  [ विनोदी कथा संग्रह ]
  ले. अनंत तडवळकर

- **नक्षत्रवेध**
  [ कृष्णमूर्ती पद्धतीवरील मराठीतील पहिलेच ज्योतिष प्रकाशन ]
  ले. म. द. गद्रे

- **पुष्पसंगे**
  ले. पु. शं. पतके

प्रकाशक :
**शशिकांत गोखले**
४ वृंदावन, गोखले मार्ग
डाक घराच्या मागे,
नौपाडा, ठाणे ४००६०२.

© म. पां. भावे
४६, आनंदाश्रम कॉलनी,
नौपाडा, ठाणे ४००६०२.

मुखपृष्ठ :
**अरुण ठाकूर**

प्रथमावृत्ती
१२–२–१९७७

मुद्रक :
**स. पां. जोशी**
श्री समर्थ प्रिंटिंग प्रेस,
ट्रेझरी ऑफिससमोर,
जांभळी नाका, ठाणे.

REFBK-0021501

# मसाला पान

[ विनोदी कविता संग्रह ]

— कवि —

म. पां. भावे

सुयश प्रकाशन

मूल्य ५ रुपये



# मनोगत

गद्य विनोदी लेखनाची मराठीत उणीव नाही. त्यामानाने विनोदी काव्याची निर्मिती खूपच कमी आहे. त्यातही विडंबन गीते हा प्रकार कै. आचार्य अत्रे व दत्तू बांदेकर या दोन श्रेष्ठ साहित्यिकांखेरीज कोणी फारसा हाताळलेला नाही. तसा प्रयत्न मी काही प्रमाणात केला आहे. वेळोवेळी निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीत केलेली विडंबने, बदलत्या परिस्थितीमुळे, काव्यसंग्रहात मला समाविष्ट करता आली नाहीत. तरी पण जी विडंबन गीते या संग्रहात आहेत ती विनोदप्रिय वाचकाला सुखावतील असे वाटते. याखेरीज विनोदी कविता, वात्रटिका, शेरशायरी यांचाही या संग्रहात समावेश आहे. धकाधकीच्या जीवनाने वैतागलेल्या चेहऱ्यावर या कवितांमुळे थोडीशी जरी स्मितरेषा उमटली तरी खूप झालं एवढीच माफक अपेक्षा !

गीत लोकप्रिय असल्याखेरीज विडंबन गीताला खरी रंगत येत नाही. म्हणूनच ज्या लोकप्रिय गीतांचे मी विडंबन केले आहे, त्या श्रेष्ठ गीत-रचनाकारांची मी मनापासून क्षमा मागतो.

या छोटया संग्रहाला सुप्रसिद्ध साहित्यिक पद्मश्री अनंत काणेकर यांची आशिर्वादपर प्रस्तावना लाभली हे माझे परमभाग्यच ! मी त्यांचा सदैव ऋणी आहे.

सुबक छपाईबद्दल समर्थ प्रेसचे संचालक व सन्मित्राचे संपादक श्री. स. पां. जोशी व त्यांचा कामगारवर्ग यांना मनःपूर्वक धन्यवाद.

आपल्या कुंचल्याच्या किमयेने पुस्तकाची आकर्षता वाढविणारे तरुण चित्रकार श्री. अरुण ठाकूर यांना मी कसा विसरू शकेन ? त्यांचे ऋण शिरावर वाहणे हा माझ्या अभिमानाचा विषय ठरावा. उत्कृष्ट मुखपृष्ठ छपाईबद्दल रचना स्क्रीन प्रिंटर्सचे श्री. विजय पटवर्धन तसेच ब्लॉकमेकर्स बॉम्बे प्रोसेस स्टुडिओचे श्री. कामत यांचा आणि आपल्या जवळील बॉक्स वापरण्यासाठी उदार मनाने परवानगी दिल्याबद्दल श्री. मधुकर पाटकर ( संपादक 'आवाज' ) या सर्वांचा मी अतिशय आभारी आहे.

प्रकाशक श्री. शशिकांत गोखले यांचे सहकार्य तर फारच मोलाचे. त्यांचा स्नेह असाच वृद्धिगत होवो हीच अपेक्षा.

अखेर प्रत्येक विनोदप्रिय वाचकास हे पुस्तक अर्पण करून मी माझे मनोगत पुरे करतो.

—म. पां. भावे.

# मसाला पान रंगण्यापूर्वी

'**मसाला पान**' या विनोदी काव्यसंग्रहाच्या निमित्ताने मी प्रथम श्री. म. पां. भावे यांचे हार्दिक स्वागत करतो. कारण मराठी साहित्यात गद्य विनोदी वाङमयाची निर्मिती जरी विपुल असली तरी विनोदी काव्य निर्मिती अल्पच मानावी लागेल. तेव्हा या पार्श्वभूमीवर श्री. भावे यांचा विनोदी काव्यलेखनाचा उपक्रम स्तुत्यच आहे. त्यातही विडंबन गीते हा प्रकार तसा थोडासा अवघडच. परंतु श्री. भावे यांनी तोही प्रकार यशस्वीपणे हाताळला आहे ही समाधानाची बाब. श्री. भावे यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची राजकीय विडंबने बदलत्या परिस्थितीमुळे या संग्रहात समाविष्ट होऊ शकली नाहीत असे कळते. ती असती तर थोडी जास्तच मजा आली असती.

विडंबन गीतप्रकारात "खंगत या सदनात नाथा, पोरांची बरसात", अगर "भार्या, न तू वैरिणी", "शुक्रतारा मंद वारा चांदणे पैशातुनी" वगैरे गीते उजवी वाटतात. विनोदी काव्यांत "अशी आमची बायको आहे" व "असं आमचं ध्यान आहे" या परस्परविरोधी भावना व्यक्त करणाऱ्या कविता जरूर परिणामकारक ठराव्यात. यावरून श्री. भावे यांना विनोदाची चांगली जाण आहे हे नक्की. तेव्हा त्यांनी यापुढे विनोदी काव्यासाठी आणखीन काही वेगवेगळे विषय वेगवेगळ्या जीवन क्षेत्रातले निवडावेत म्हणजे त्यांचा यापुढील काव्यसंग्रह याहीपेक्षा जास्त विविधतेने नटलेला असेल असे वाटते. मी त्यांना त्यांच्या उपक्रमास सुयश चिंतितो.

—अनंत काणेकर




## गीत १ ले

[ चाल : ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा सखूचा मेव्हणा ]

ह्यो ह्यो ह्यो पाव्हणा, मधूचा मेव्हणा
अिथंच राहून खातोय ग, संमदाच घोटाळा करतोय ग ॥

मधावर माशी, बसावि जशी
तसाच बिलगुन राहतोय ग, संमदाच घोटाळा करतोय ग —१

प्रेमाचा फासा, टाकून असा
घरातलं खातुया, बाअि भसा भसा
पैशाचा चुरा, करतोया पुरा
जाळ्यात आमाला धरतोय ग, संमदाच घोटाळा करतोय ग —२

गुळाला मुंगळा, चिकटुन बसे
वागणं याचं दिसतंय तसं
डोळ्यात पाणी, येतंया झणी
काअितरी पाणी मुरतंय ग, संमदाच घोटाळा करतोय ग —३

[ चाल : त्या चित्त चोरट्याला कां आपुले म्हणू मी ]

त्या चित्त चोरट्याला का आपुले म्हणू मी
ते बील भामट्याचे, दिनरात का भरू मी ॥

सहजी करी धरावे, नख लावुनी खुडावे
वाटेच फूल त्याला बागेतले जणू मी— १

नजरेत नीट आले, मी घेतले बघून
लवकून पापणीचा, सोडी खुशाल बाण
त्या हीन वर्तनाचे, ग मोडिले धनू मी— २

मज वाटले असे हा, किती साळसूद बाओ
परि वाटले तसा हा, गे वागणार नाही
हे पात्र मी कसे ग, हृदयात या जपू मी— ३

¤¤¤

[ चाल : घरी माझिया नटले गोकुळ ]

घरी माझिया नटले गोकुळ । मी राधा तू कान्हा भोंगळ

वाजविशी तू शंख जोवरीं
स्पंदन माझ्या होअि अंतरी
फुटकी घागर, हाति गोधडी
खट्याळ हसती शेजारी खल । मी राधा तू कान्हा भोंगळ — १

महिन्याकाठी रांग लावितो
त्यातच अपुलें मीपण हरतो
धुंद जगाला कशी कळावी
अपुली भीती, अपुले गोकुळ । मी राधा तू कान्हा भोंगळ — २

¤¤¤

## गीत ४ थे

[ चाल : अिथेच आणिक या बांधावर अशीच श्यामल वेळ ]

अिथेच आणिक या कट्ट्यावर अशीच शामलवेळ
प्रिया रे किती रंगला खेळ

शांत दुपारहि, शांत सरोवर
पवन चोरटा वाहे सुंदर

अबोल चावट दोन जिवांचा अवचित जमला मेळ
प्रिया रे किती रंगला खेळ — १

जिन्या खालच्या प्रशांत जागी
लपली हळु हळु सुंदर रजनी

अन् मोक्यावर अजुनी रंगे बघ सोन्याची वेळ
प्रिया रे किती रंगला खेळ — २

[ चाल : रिमझिम झरती श्रावण धारा ]

रिमझिम झरती श्रावणधारा, गळती या सदनात
प्रिया रे भकास वाटे रात ॥

बरस बरस तू मेघा रिमझिम
आज यायचे माझे प्रियतम
आतुरलेले लोचन त्यांचे रडती अंधारात
प्रिया रे भकास वाटे रात — १

प्रासादी या रिमझिम येता
पाऊसधारा सदनी पडता
बरस असा की प्रियाच जाअिल माघारी दारात
प्रिया रे भकास वाटे रात — २

मेघा असशी तू आकाशी
अमुचे घर गळतीने भरशी
वर्षामागुन वर्षंशि सदनी, करिशी नित बरसात
प्रिया रे भकास वाटे रात — ३

## गीत ६ वे

[ चाल : हात तुझ्या हातातुन धुंद ही हवा ]

हात तुझ्या हातातुन कुंद ही हवा
रोजचाच तूच आज मानिते नवा

रोजचीच ही पोरे, रोजचेच तारे
मानिते परी फिरून, तेच गोड सारे
ही किमया स्पर्शाची जाळिते जिवा — १

विटले रे डोळे हे, सुख न मला साहे
विरघळून रक्त आज गरिबीतुन वाहे
आज जळे सदनातुन मंदसा दिवा — २

जन्म जन्म हे दुर्दिन, कठिण काळ येतो
स्वप्नांच्या आशेने, वाळवंटी नेतो
पोरांचा शय्येला, बिलगतो थवा — ३

## गीत ७ वे

[ चाल : श्रीरंग सावळा तू, मी गौरकाय राधा ]

ती— श्रीरंग बावळा तू, मी भीमकाय राधा
ही प्रीत दो जिवांची, उद्वेग रे मुकुंदा

तो— ये राधिके अशी ये, होऊन क्रूरक्रुद्धा
नयनातुनी फुलू दे अंगार गीत यंदा
ये चंडिके अशी ये, अुधळीत दिव्य कांती
भेसूर त्या स्वरांनी भिववीत सांजवाती
मिटल्या फुलापरी त्या, तव क्षीण लोचनात
लावून क्षीणलेली भावूक प्रीतज्योत

ती— श्रीरंग बावळा तू—
ना लोचनी प्रिया रे, हृदयी तुझेच रूप
दिनरात पाहते मी, माझेच येथ रूप
खाते मधेच खाणे, स्वप्नीं नको उखाणे
तुझियाविनाच धावे, मन पाखरू दिवाणे

तो— ये राधिके अशी ये —

## गीत ८ वे

देशांत आणिबाणी आली आणि सारं कसं शांत शांत झालं. अनेकांनी सुटकेचे नि:स्वास टाकले. अशा या आणिबाणीचे आनंदाने स्वागत करताना सामान्य माणूस तिला म्हणू लागला–

[ चाल : तुझे गीत गाण्यासाठी सूर लावु दे रे ]

तिन्ही लोक आनंदाने भरून गाऊ दे गे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे गे

शुद्ध मिसा लावुनी साऱ्या रोखियल्या वाटा
रान फुले लेवुनि आल्या, शुभ्र शुभ्र लाटा
या सुन्दर यात्रेसाठी मला येऊ दे गे
तुझे गीत गाण्यासाठी, सूर लावू दे गे ॥ १ ॥

रोज पोलिसांची वर्दी पहाटेस दारी
भिंतीतुन दिडदा, दिडदा फोडिती तिजोरी
तो अफाट काळा पैसा, मला पाहू दे गे
तुझे गीत गाण्यासाठी, सूर लावू दे गे ॥ २ ॥

✲✲✲

## गीत ९ वे

या उलट विरोधी पुढारी मनातून खिन्न झाले. आपले सर्व डाव एका क्षणात उधळले गेले हे पाहून एक पुढारी आपल्या पत्नीस म्हणतो—

[ चाल : विसर प्रीत, विसर गीत, विसर रीत आपुली ]

विसर संप, विसर बंद, विसर रीत आपुली
यापुढे ग घोषणात, आर्तता न राहिली ॥

कंठ दाटतो असा, शब्द मुळी न फुटे
काळजात एक तंतुही तसाच तुटे
मीच मांडिल्या जनात शून्यता विसावली
विसर बंद, विसर संप, विसर रीत आपुली ॥ १ ॥

शब्द मी दिलाच एक, कीर्तिला विलोभुनी
वंचनाच अखेर गे, डाव सर्व मोडुनी
मी उगाच स्वप्नवेल, जीवनात रेखियली
विसर बंद, विसर संप, विसर रीत आपुली ॥ २ ॥

☼ ☼ ☼

## गीत १० वे

'आणिबाणी'चे स्वतःचे मन जाणून घेण्यासाठी आम्ही तिची भेट घेतली – तेव्हा ती फार खुषीत दिसली. आपली सवत 'महागाई' हिची आणि तिच्या पाठीराख्यांची खोड आपल्यामुळे चांगलीच मोडली गेली म्हणून ती आपले मनोगत प्रगट करताना म्हणत होती—

[ चाल : डाव मांडुन मांडुन मोडू नको ]

डाव मांडून अर्धाच मोडू नको
डाव मोडू नको, डाव मोडू नको

आणिले तू तुझे, सर्व मी आणिले
सर्व काही मनासारखे मांडिले
तूच सारे तुझे, दूर लोटू नको
डाव मोडू नको, डाव मोडू नको ॥ १ ॥

गोकुळाची सखी, तूच केले मला
कौतुकाने मला हार तू घातला
हार घालून अर्धाच तोडू नको
डाव मोडू नको, डाव मोडू नको ॥ २ ॥

¤ ¤ ¤

या उलट 'महागाई'चे कपाळ पांढरे फटक पडले. आपल्या पाठीराख्यांची साफ जिरली. आता आपली अब्रू एका 'गोपाला' खेरीज कोणी राखणार नाही. म्हणून ती गोपालकृष्णाला म्हणू लागली—

[ चाल : लाज राखि नंदलाला ]

तव भगिनीचा धावा ऐकून धाव घेइ गोपाळा
लाज राखि नंदलाला ।।

अबले सम हे कौरव सगळे, खाली माना घालुनी बसले
आणि रक्षण्या शीलच माझे, कुणि नसे उरला
गोपाळा, लाज राखि नंदलाला ।।१।।

आसु माझिया नयनी थिजले, घाबरुनी मी डोळे मिटले
रूप पाहाया जुने गोजिरे, कंठ आता दाटला
गोपाळा, लाज राखि नंदलाला ।।२।।

☼☼☼

## गीत १२ वे

[ चाल : अरे संसार, संसार ]

अरे संसार संसार, चालतसे रांगेवर
आधी उन्हाचे चटके, मग मिळते साखर

अरे संसार संसार, खोटा कधी म्हणू नये
रॉकेलच्या प्राप्तीसाठी, लोटा कधी नेऊ नये

अरे संसार संसार, नाही हसणं लाजणं
करबोजांचा संभार, म्हणू नये रे लोढणं

अरे संसार संसार, करी दोघांना बेजार
इथे सुखाला नकार आणि दुःखाला होकार

अरे संसार संसार, दोन जीवांचा आधार
कधी नगद उधार, देण्याघेण्याचा व्यापार

¤¤¤

आणिबाणीमुळे, अनेक वर्षे लबाडी करून काळा पैसा मिळविणाऱ्या शेटजीची तिजोरी रिकामी झाली होती. अशा दरिद्री परिस्थितीत त्याच्या मुलाचे लग्न झाले. घरात येणाऱ्या सुनेचे लक्ष्मी म्हणून स्वागत करण्यास त्याचे उदास मन तयार होईना. तो मनाशी म्हणू लागला—

[ चाल : नकोस नयनी भरू आसवे ]

नकोस नयनी भरू आसवे, देऊ नको हुंदके
चंडिकाच तू नव्या घराची, होशिल ग लाडके ||

तुझ्या पाऊली येइल आता
आनंदाच्या कुठुनी सरिता ?
घरकुल अपुले विषण्णतेने होईल ग रोडके
चंडिकाच तू नव्या घराची, होशिल ग लाडके— १

इथे अंगणी कशी नाचतील
तुझ्या स्मिताची सुमने कोमल
तुझ्या वास्तवामुळेच उरतिल या सदनी हाडके
चंडिकाच तू नव्या घराची, होशिल ग लाडकें— २

नको बावरू मुळी अशी तू
मनी न ठेवी कसला चितू
तुझ्या दृष्टीचा फेरा आम्हा भोगुदेच चंडिके
चंडिकाच तू नव्या घराची होशिल ग लाडके— ३

✲ ✲ ✲

## गीत १४ वे

[ चाल : जय गंगे जय भागिरथी ]

नकोस जनते राग धरू ग, नको मस्तकीं राख भरू
महागाईचे स्तोत्र गात या, संसाराला पार तरू
जय जनते जय महागाई
थोर आमुची पुण्याई

ही दैवाची उलटी रेघ
माथ्यावर चिंतेचा मेघ
भाग्य आपुले, उलटे म्हणुनी, महागाईचे चरण चुरू
जय जनते जय महागाई
थोर आमुची पुण्याई — १

महागाईचा हा अवतार
गरिब जनांना करितो ठार
उकडा तांदुळ, तांबुस ज्वारी, खाऊनि देहा जतन करू
जय जनते, जय महागाई
थोर आमुची पुण्याई — २

बढतीसाठी देऊ लांच
लांच नसे तर भोगू जाच
भले-बुरे ते नेते जाणे, आपण अपुले काम करू
जय जनते, जय महागाई
थोर आमुची पुण्याई — ३

जनते तुज हा मंगल योग
अन्न खाऊनी होई रोग
चहा गुळाचा पिऊनी सारे जीवन अपुलें गोड करू
जय जनते, जय महागाई
थोर आमुची पुण्याई — ४

✠ ✠ ✠

## मालक विठू नोकरास—

[ चाल : क्षणभर थांब जरा रे विठू ]

आलो मी हितगुज कराया, चिडू नको रे विठू
पळभर थांब जरा रे विठू ॥

असा येऊनी भलत्या पारी
नकोस आणू मोर्चा दारी
अधिकाऱ्यांची सेवा सोडूनि सांग कसा रे उठू ......?
पळभर थांब जरा रे विठू......१

कूस बदलुनी ही महागाई
देत दिलासा आम्हालाही
पाय चेपिता नेत्याचेही पोट लागले सुटू
पळभर थांब जरा रे विठू......२

करिशी का माझ्याशी कावा
तुझ्याचसाठी माझी सेवा
अंतर देऊ नको, नको रे मन अपुले पालटू
पळभर थांब जरा रे विठू......२

¤¤¤

## शेटजी नेत्यास उद्देशून—

[ चाल : तू अबोल होउनि जवळीं मजला घ्यावे ]

तू अबोल होऊनि जवळी मजला घ्यावे
तू भाव वाढवुन, धुन्द चांदणे प्यावे ।।

ही अशीच अपुली सरळ असावी प्रीती
खाऊनी लांच ही मस्त सदोदित बरती
ते थोरपदाचे झुम्बर नित्य झुलावे
तू अबोल होऊनी जवळी मजला घ्यावे —१

छळमार रोजला हळुच योजुनि व्हावा
हळु भाववाढीचा बहर उफाळुनि यावा
हे मस्त सुखावह वैभव तू फूलवावे
तू अबोल होऊनी जवळी मजला घ्यावे ! —२

¤¤¤

## शेटजी महागाईस उद्देशून—

[ चाल : शुक्र तारा, मंद वारा ]

शुक्र तारा, मंद वारा, चांदणे पैशातुनी
चंद्र आहे, स्वप्न पाहे, धुंद या धंद्यातुनी
आज तू धंद्यात माझ्या, मिसळुनी धंदा पहा
तू अशी जवळी रहा —१

मी कसा शब्दात सांगू, भावना माझ्या तुला
तू तुझी समजून घे ग, रंगीढंगी या मला
अंतरीचा हेतु माझा आज तू हसुनी पहा
तू अशी जवळी रहा —२

लाजरी माझी सखी तू स्वार्थ हा बिलगे जिवा
बरकतीच्या स्पंदनेने अन् मिळू दे हा खवा
वाढलेल्या या नफ्याने भारलेला जन्म हा
तू अशी जवळी रहा —३

पाहिले स्वप्नात मी जे ते मिळे जागेपणी
धावुनी आलीस तू गे आज माझ्या अंगणी
फायदा धंद्यातुनी आता फुलावा जीव हा
तू अशी जवळी रहा —४

☆☆☆

## गीत १८ वे

[ चाल : माता न तू वैरिणी ]

कारकुनाची नव्हेस पत्नी, नव्हेस गोगलगाय
दीनदरिद्री वंशी उधळी, भार्या नांदे काय ?
पदोपदी तव हट्ट धरोनी, छळली कैदासिणी
भार्या न तू, वैरिणी —१

भांडि धुण्याच्या कामासाठी, ठेविलास तू 'राम'
सांगु किती अन् कसे तुला मी, खिशांत नाही दाम
तुझ्या अशा या उधळपट्टिनें, जातो वैतागुनी
भार्या न तू, वैरिणी —२

डाव रमीचा कुठे मांडता, होतो तव अंगार
"पत्ते कुटणें, पुरे जाहले", शब्दांचा भडिमार
रविवारची साफसफाई, आठवते तुज क्षणी
भार्या न तू, वैरिणी —३

महिन्याकाठी नवी पातळे, नवा सिनेमा हवा
नच हे घडता रडुनी करशिल उगाच देखावा
नाक दाबुनी तोंड उघडशी, असली सहचारिणी
भार्या न तू, वैरिणी —४

नातलगांचे माहेराहुनि सततचि येणे धडे
मम मित्रांच्या आगमने तव, मनासि जाती तडे
आदळ आपट करूनि दणादण, हलवितेस धरणी
भार्या न तू, वैरिणी —५

कचेरीतल्या कुणा मुलीशी, सहज बोलतां हसून
उगा संशये छेडितेस मज, प्रश्न हजार करून
मम इच्छेला, हटवादाने, देसी हुलकावणी
भार्या न तू, वैरिणी —६

शेजाऱ्यांशी करूनी तुलना, दूषण देशी मला
'मूर्ख' 'अजागळ' विशेषणांचा, मजवरती हल्ला
सोनेरी पिंजऱ्यांत फसला, पक्षी रात्रंदिनी
भार्या न तू, वैरिणी —७

❋❋❋

[ चाल : इंद्रायणिकाठी ]

मुंबापुरिकाठी चोरांची आळंदी । लागली समाधी ढोंगीयांची
ढोंगियांचा राजा भोगतो आजीव । नाचती भैरव मागेपुढे
मागेपुढे दाटे धनाचा उजेड । अंगणात झाड वैफल्याचे
काळोखी राहिले उजेड होउनि । यशाचा सोपान महागाई

¤ ¤ ¤

[ चाल : देह देवाचे मंदीर ]

नेते देवाचे मंदीर । त्यात सत्ता परमेश्वर
देव नेत्यात नेत्यात । का हो जाता मंदीरात

जशी उसात हो साखर । तैसा नेत्यात ही ईश्वर
जसे दुधामधे लोणी । तसा नेत्यात चक्रपाणी
सखा सांगे मठुजना । देव नेत्यात पहाना

☼ ☼ ☼

## गीत २१ वे

[ चाल : हासत या सदनात नाथा ]

खंगत या सदनात नाथा, पोरांची बरसात, नाथा

अपुल्या हाती फुटकी कवडी, रंगत ना जगण्यात, नाथा

नाव उलटली, शान हरपली, चंदेरी जगतात, नाथा

तिन्ही त्रिकाळी, अपुल्या घरची, फजिती लोक पहात, नाथा

## गीत २२ वे

[ चाल : कधी बहर कधी शिशिर ]

कधीं कहर, कधी फिकीर, परंतु दोन्हीं एक बहाणे
डोळ्यामधले आसू पुसशी, रेशनमधले खाणे ॥

कुबट गंध धान्यावर यावा
हळुच तांबडा मिलो खावा
आणि अचानक गळून पडावे विसरून सगळे देणे
डोळ्यामधले आसू पुसशी, रेशनमधले खाणे —१

भाव देउनी साखर खावी
क्षणात कधि सरली न कळावी
अन्न पुरेना म्हणुनि झुरावे नंतर लाजिरवाणे
डोळ्यामधले आसू पुसशी, रेशनमधले खाणे —२

हळुच मुलांच्या बिलगुन गाली
नाजुक गाणी कधी न गायिली
आता उरली आर्त कहाणी, सूरच केविलवाणे
डोळ्यामधले आसू पुसशी, रेशनमधले खाणे —३

## गीत २३ वे

[ चाल : धुंद वादळाची होती रात्र पावसाची ]

भेट तुझी माझी स्मरते अजुन त्या दिसाची
धुंद वादळाची होती रात्र पामराची ॥

कुठे दिवा नव्हता अगदी नसे नभी तारा
आंधळ्या तमातुन केला प्रीतिचा अिशारा
तुला मुळी नव्हती बाधा, रोड रोमियोची
धुंद वादळाची होती रात्र पामराची —१

फेस मुखी आला माझ्या थेंब तसे भाली
पाठीवर लाथा बसुनी पुरी गदा आली
बुक्क्यांनी सरली गाथा प्रीतिच्या रसाची
धुंद वादळाची होती रात्र पामराची —२

सुरंगीच हलक्या चपला, सुरंगीच लाथ
स्वप्नातचि सौख्य भरावे, तसा सर्व थाट
मनालाहि भोवळ आली तिच्या वागण्याची
धुंद वादळाची होती रात्र पामराची —३

¤¤¤

## गीत २४ वे

[ चाल : आई तुझी आठवण येते ]

आई तुझी आठवण येते
दारिद्र्याच्या कल्लोळांनी काळिज कालवते ॥
हाक मारितो आई आई
महागाईला सीमा नाही
मिसळ पाव अन भजी खाऊनि, पोटहि ना भरते
आई तुझी आठवण येते —१

जनसेवेचा नसुनि उमाळा
मंत्रिपदावर ठेवुनि डोळा
सहजासहजी अभिवचनांची, खैर सदा उठते
आई तुझी आठवण येते —२

तव मुक्तिस्तव आत्मसमर्पण
करूनी झाले पूर्वज पावन
आज तिजोरी भरण्यासाठीं, पापहि बघ पचते
आई तुझी आठवण येते —३

नव्या युगातिल नवा जमाना
जगा शिकवितो "अनपढ शाना"
एकहि ना धड, चिंध्या साऱ्या, तव नशिबीं जनते
आई तुझी आठवण येते —४

चारित्र्याहुनि स्वार्थ भयंकर
औषधाहुनि वेष्टण सुंदर
तुपाऐवजी वनस्पतिवर, जनता बघ जगते
आई तुझी आठवण येते —५

¤¤¤

## गीत २५ वे

[ चाल : पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ]

दैवजात तुजला बघता, दोष ना मनाचा
तुझ्याधीन आहे आता, प्राण या प्रियाचा ॥

माय माझि नाही दोषी, नसे दोषी तात
छंद तुझा जडला मजला, जाण कर्मजात
खेळ चाललासे आता, दोन प्रेमिकांचा
तुझ्याधीन आहे आता, प्राण या प्रियाचा —१

प्रीत पांखरांची होओ, सहज कधी भेट
प्रीत प्रीत जुळुनी वाढे गुप्त गाठभेट
प्रीत मळा फुलु दे सारा, दोन प्रेमिकांचा
तुझ्याधीन आहे आता, प्राण या प्रियाचा —२

प्रेम-मरण ह्यातुनि सुटला, कोण प्राणिमात्र
प्रीतिमुक्त जगला का गे कुणी जीवनात
तरुणपणी बहरुनि येतो, फुलोरा मनाचा
तुझ्याधीन आहे आता, प्राण या प्रियाचा —३

¤¤¤

## गीत २६ वे

[ चाल : कुठे शोधिशी रामेश्वर ]

कुठे शोधु मी धनेश्वर अन् कुठे शोधु मी काशी
हृदयातिल भगवंत बापुडा हृदयावीण उपाशी ॥

झाड फुलांनी आले बहरून
कशास पाहू डोळे उघडुन
वर्षाकाठी पगार सारा
त्यात सुखाचा नसे इशारा
काय मला उपयोग आंधळ्चा, असुनी ग्रेड उशाशी —१

लॉटरिच्या या गळ्यात माळा
बुवाबाजिचे भस्म कपाळा
तरिही पैका नच ये हाती
मातीतुन ये फुटके मोतीं
हेच अभाग्या अमुच्या नशिबी, घरात सासू खाशी —२

पत्नि बोलते, बाळ मुखातुन
आणि मागते, काही हासुन
सदा बापुडे, अम्ही भिकारी
पैशासाठी आर्त पुकारी
अवति भवती असुनि दिसेना शोधितोच आकाशी —३

※※※

## गीत २७ वे

अेका वर्षी पंढरपूरच्या विठ्ठलाची पूजा मंत्र्यांच्या हातून करावयाची नाही असा निर्णय घेण्यात आला त्यावरून सुचलेले गीत.

[ चाल : धाव पाव विठू आता ]

धाव पाव विठू आता, होऊ नको धुन्द
यंदापासून झाली देवा, तुझी पुजा बंद
नको मंत्र्याहाती पूजा, लोक धरिती हेका
तुझ्या नावे विठ्ठला रे, मारितोची हाका
नको करू देवा अमुची भरभराट मंद
तुझ्याविण होईल अमुचा श्वासोश्वास बंद

✲✲✲

## गीत २८ वे

[ चाल : अरे देवा तुझी मुले ]

अरे देवा तुझ्या मुलीं, अशा का रे वागतात
कधि लाजती हासूनी, कधीं दूर दहा हात ॥

नोकझोक पाहुनीया, सारा व्यवहार चालतो
राजेपणा माणसाला, का रे जन्मासवे येतो
कुणि झूरे अंतरात, कुणी चालति डौलात
अरे देवा तुझ्या मुली, अशा का रे वागतात — १

प्रिया घरचे भोजन सारा डाव अंतरीचा
चाट बसे खिशालाही, मुकी होअि तशी वाचा
गोड पोरींच्या या कथा, आम्हा साऱ्यांच्या मनात
अरे देवा तुझ्या मुली, अशा का रे वागतात — २

जरी डौलदार राणा कोणी अैटीत वागला
गावाबाहेर भेटूनी, देती समजही त्याला
प्रेम प्रीतीचे अभंग, आळविती देवळात
अरे देवा तुझ्या मुली, अशा का रे वागतात — ३

आता वागण्याची तऱ्हा, जरा निराळी असावी
तरुणींच्या बोलण्याची, गोडी अनुभवा यावी
प्रीतवेड ज्याच्या मनी, तोचि पडतो प्रेमात
अरे देवा तुझ्या मुली, अशा का रे वागतात — ४

[ चाल : सर्वात्मका सर्वेश्वरा ]

गर्वात्मका गर्वेश्वरा
शंकाधरा, तमशंकरा
जे जे जगी, दिसते तया
माझे म्हणा, स्वाहाकरा
स्वार्थांध या जगतांत व्हा
अप्रीय या, जनतेत व्हा
कटुताप द्या, द्या भग्नता
भयकारिता स्वहिताकरा

✡✡✡

## गीत ३० वे

[ चाल : आरतीप्रमाणे ]

जयदेव जयदेव जय श्री गणराजा
घासुनि घासुनि झरणीं सरला रे भेजा ॥

ललाट रेषा आमुची नाहीं भाग्याची
वर्णू देवा किती कहाणी कर्माची
रामराज्यीं या होळी सर्वांची
लांचलुचपतिविना सिद्धि न कार्याची —१

डालडारूपी घृतीं, भिजवुनिया वाती
प्रेमें आम्ही देवा, गातो तुज आरतीं
महर्गतेची आम्हां, रात्रंदिन धास्ती
महिना सरतां सरतां पैशांची भ्रांती —२

अन्नधान्याचेहीं भावचि अति जबर
शिक्षणाच्या नांवें चालला कहर
भारुड पुस्तकांचा, चिमण्यांना भार
पुस्तक, फिया, यांनी आम्ही बेजार —३

परिस्थितीचे देवा, आम्ही पाईक
म्हणुनी यंदा नाहीं, केले मोदक
सांप्रत सर्वांवरी, सोडितो उदक
श्रद्धा तुमचे ठायीं आहे निःशंक —४

☆☆☆



# विनोदी कविता

## सद्या

सुरेख, सुंदर, 'सुलभा काळे'। 'सद्या' भाळला पुरता तिजवर
अंतरि त्याच्या चाले खळखळ । सद्या मनानें बनला प्रियकर — १

फुलांभोंवतीं घालुनि पिंगा । गुंजारव करि भृंगहि जैसा
तिच्या घराच्या अंवतीभंवती । सद्या घालितो घिरट्या तैशा — २

रस्त्यामध्यें तिला पाहतां । उगिच फिदिफिदी सद्या हांसतो
उभी राहतां बस 'क्यू' मध्यें । सद्याहि मागें उभा राहतो — ३

नकळत (?) तिजला धक्का बसतां । तत्परतेनें म्हणतो 'सॉरी'
मर्कटलीला पाहुनि हंसते । सद्या अंतरीं खुलतो भारी — ४

तऱ्हेतऱ्हेचा वेष तयाचा । हातीं त्याच्या 'अमृत', 'मंथन'
वाचन कसले, निव्वळ फॅशन । प्रियकरणीचें सदैव चिंतन — ५

असा सद्याचा खेळ चालला । दिवसामागुनि दिवस लोटले
परी सद्याची प्रगति दिसेना । परंतु 'झुरणें' सुरू जाहले — ६

तोंच अचानक एके दिवशीं । पोस्टामधुनि पाकिट आले
"सुलभा काळे" सही पाहुनी । आनंदाचें भरतें आलें — ७

'सख्या, प्रियकरा, नको रूसूं रे'। तिनें तयाला लिहिलें होतें
उद्यानीं ये धांवुनि उदइक । तुझीच सखया वाट पाहते — ८

हर्ष जाहला सद्यास भलता । शुभ्र इस्त्रिचे कपडे केले
सेंट त्यावरी थोडा टाकुनि । केसांनाही वळणचि दिधले — ९

धांवत गेला उद्यानीं मग । शोधुं लागला प्रियकरणीला
नव्हतें तेथें दुसरें कोणी । पैलवान परि होता बसला —१०

पैलवानानें पृच्छा केली । कळेल कां हो नांव आपुलें
नांव सांगता, सद्यास वदला—'येतिल आत्तां सुलभा काळे' —११

क्षणांत त्याच्या गालीं बसली । थप्पड– जैसी वीज झळाळे
दिली गचांडी पैलवानानें । हाय, सद्याचे फिरलें डोळे —१२

एप्रिलची ती तारिख पहिली । 'सद्या' जाहला 'एप्रिल फूल'
रगडित रगडित अंग आपुलें । सद्या बोलला, 'यू डॅम फूल' —१३

☆☆☆

# जिकडे तिकडे पोरी आड

इकडे विहीर, तिकडे आड
जिकडे तिकडे पोरी आड ॥

साडेतीनच्या ' शो ' साठीं
रांगेंत आम्ही उभे असतो
वाट पहात खिडकीजवळ
आमचा नंबर केव्हां येतो...

कसेबसे तासानंतर
खिडकीजवळ आम्ही येतो
तोंच अचानक " अिश्य, अय्या "
मंजुळ स्वर कानीं येतो...

हात खुपसून खिडकींमध्ये
मंजुळ स्वर बोलूं लागे
" पांच तिकिटें " द्या ना प्लीज
पैसे मोजून चालूं लागे...

आणि अमुच्या नशिबीं नंतर
झळके बोर्ड " हाऊसफुल "
ऐशा आहेत पोरी द्वाड
जिकडे तिकडे पोरी आड... १

ऑफीसमध्यें जाण्यासाठी
बस् स्टॉपवर आम्ही येतो
मारुतीच्या शेपटीसमान
'क्यू'त ऐशा उभे असतो...

" लाल, लाल, " डगलेवाल्या
बसेस् येतात डोलत डोलत
आमच्याकडे कानाडोळा
करून जाती पुढती धावत...

अखेर येते बस आमुची
जरा मनाला धीर येतो
कंडक्टर तो दारावरला
" लाइनसे आना " ऐसे वदतो...

कसली लाईन ? घुसल्या पोरी
अप्पर डेकवर झाली स्वारी
आम्ही होतो गारेगार
जिकडे तिकडे पोरी आड... २

कसेबसें मॅट्रीक होऊन
नोकरीसाठीं अर्ज देतो
अर्जासोबत रूढीप्रमाणे
शंभराची नोट देतो...

आणि अचानक एके दिवशी
पोस्टामधुनि येते उत्तर
व्हेकन्सी जरि सध्यां नाही
नांव ठेविलें वेटिंग लिस्टवर...

आणिक नंतर एके दिवशीं
"मंदा जोशी" तेथें जाते
मधाळ अपुलें हास्य दावुनी
अर्ज आपुला सादर करिते...

लगेच घडते जंतर मंतर
होकाराचें मिळतें उत्तर
आम्हावरती ऐशी धाड
जिकडे तिकडे पोरी आड... ३

हॉटेलमधें आम्ही जातो
आमचा वाली कोणी नसतो
जिकडे पोरी तिकडे वेटर
आम्ही सदा वेटिंग लिस्टवर...

हाय्यर ग्रेड व्हेकंट होता
पोरी साधून घेती मोका
गोऽडसं बोलून गोऽडसं हांसून
आमुच्या हातीं देतिल खोका....

आणिक जेव्हां मेजावरती
कामाचा तो डोंगर वाढे
हांसत म्हणतील "मिस्टर बढे
करा ना प्लीज हेल्प गडे"...

ऐसें अमुचें जीवन बेचव
कुठंच कसला नाहीं भाव
आमच्यासाठीं बंद कवाड
जिकडे तिकडे पोरी आड... ४

# कारण आम्ही लग्न केलं

आम्ही तेव्हां तरुण होतो
तरुणींच्या मागे होतो
लाल, हिरव्या, पिवळ्या साड्या
आम्ही तेव्हां पाहात होतो
फिदिफिदी हंसत होतो
आतां मात्र साधत नाहीं
साधेलसं वाटत नाहीं
साधलं तरी शोभणार नाहीं
—कारण आम्ही लग्न केलं १

प्रीतीसाठीं ओंठावरती
कुर्बानीची भाषा होती
तरुणींच्या मीलनाची
अभिलाषा तेवत होती
प्रणयाच्या पांचट गोष्टी
वाचण्याची हौस होती
आतां मात्र ओठांवरती
'राम–सीता'' यांच्या गोष्टी
—कारण आम्ही लग्न केलं २

"आवारा"चा वेष होता
"नर्गिस"चा ध्यास होता
सिनेमाच्या संगीताचा
तेव्हां मोठा छंद होता
आतां मात्र सिनेमाचे
नांवसुद्धां घेणें नाहीं
खिशांत फुटका पैसा नाहीं
—कारण आम्ही लग्न केलं ३

तारुण्याची मस्ती होती
कुस्तीची रग होती
आकाशाला गवसणी
घालायची धमक होती
आतां मात्र जमत नाहीं
संसाराच्या ओझ्यापुढें
कारट्यांच्या मस्तीपुढें
हातून कांही होत नाहीं
—कारण आम्ही लग्न केलं ४

देवळानजिक, पारावर
दादरच्या चौपाटीवर
चाळीवरच्या गच्चीवर
नामघोष "तिचा" होता
आतां मात्र मुखामधें
"रामा" विण नाम नाहीं
दुजे नाम घेणें नाहीं
—कारण आम्ही लग्न केलं !
कारण आम्ही लग्न केलं ५

# अशी आमची बायको आहे

अंगानं लठ्ठ आहे
डोक्यानं मठ्ठ आहे
नित्य तिचा काहीतरी
नवा नवा हट्ट आहे
स्वभावानं खाष्ट आहे
वर्षातले बारा महिने
आमच्यावरती रुष्ट आहे
तिच्यामते मी म्हणजे
अेक नंबरचा शिष्ट आहे
असं आमच्या संसाराचं
चित्र अगदी स्पष्ट आहे
अशी आमची बायको आहे ! १

आमची बायको गोरी आहे
दिसायला बरी आहे
तिच्यापुढे बोलायची
मला मात्र चोरी आहे
'मी म्हणते तेच खरं'
घमेंड अशी भारी आहे
माहेराचा गोतावळा
तिला प्रिय भारी आहे
तेवढयापुरती बोलण्यामधे
शिरापुरीची चव आहे
अशी आमच्या संसाराची
फटफजिती पुरी आहे
अशी आमची बायको आहे ! २

आमची बायको गोड आहे
आंब्याची फोड आहे
गालावरचा तीळ कसा
कोल्हापुरी गूळ आहे
लाल लाल ओठामधे
गुलकंदाची चव आहे
लाडिक लाडिक बोल तिचे
मधाचं मोहोळ आहे
तिच्याविना जीवन म्हणजे
आटलेला ओहोळ आहे
अशी आमची बायको आहे ! ३

आमची बायको काळी आहे
स्वभावानं भोळी आहे
नऊवारी हातमागावर
धारवाडी चोळी आहे
चूल–मूल यांची सदा
डोक्यावरती मोळी आहे
तिच्यामते नवरा म्हणजे
लिमलेटची गोळी आहे
नोकझोक या क्षेत्रात
एक नंबरची बावळी आहे
अशी आमच्या संसाराची
गोष्ट साधीभोळी आहे
अशी आमची बायको आहे ! ४

आमची बायको बेफाट आहे
बोलण्यामधे अचाट आहे
जिथे जिथे जाते तिथे
मान तिची ताठ आहे
मीच शहाणी इतर मुर्ख
मंत्र तिचा पाठ आहे
आपल खरं करण्याचा
तिचा नेहमी घाट आहे
वाकेन पण मोडणार नाही
असा तिचा थाट आहे
तिच्यापुढे मी म्हणजे
थंड पाण्याचा माठ आहे
अशी आमची बायको आहे ! ५

¤¤¤

# लग्न काही करूं नका !

तरुण गड्यांनो सांगतो ऐका
राग त्याचा मानूं नका
"लग्न कांही करूं नका"
जीव दुःखांत टाकूं नका !

आंब्याचि फोड चवीला गोड
तशी लग्नाचि लागते ओढ
कांहीं दिवस बरे जातात
मग जिभेला येतात फोड
संसाराच्या वेलीवरती
वालाप्रमाणें येतात मोड
आदळ आपट मोडतोड
सौ. उठविते एकच झोड
"वेंधळे आणि गाढव कुठले"
विशेषणांची खैरात होते
तुमची अक्कल क्षणाक्षणाला
कवडीमोलानं विकली जाते
म्हणून म्हणतो माझे ऐका—
"लग्न कांही करूं नका !" १

रंगलेल्या मैफलीची
रात्र सरतां सरून जाते
चंद्रासारखी कलेकलेनें
विफलतेची लाट येते
"तुम्हांला मेली हौसच नाही
माझ्यावरती प्रेमच नाहीं
वेण्या, साड्या, दागिन्यांच्या
खरेदीची भाषा नाहीं
सदा न् कदा तुमची रड"
अशी बोलून फाडफाड
ताशा बडवील थाडथाड
तुमच्यावरती उठविल झोड
म्हणून म्हणतो माझं ऐका—
"लग्न कांहीं करूं नका !" २

होऊं नये तें होऊन जाते
चार मुलांची आई होते
तुमचं पुण्य तुमच्या पदरांत
दामदुपटिनं येऊन पडतें
"अहो, म्हटलं ऐकलं कां—
दळणाचा डबा घेऊन जा
बेबीलाही शाळेंत न्या
येतां येतां भाजी आणा
ताजी शिळी नीट पहा
कासवासारखे चालूं नका"
अस्सा सौ. चा वरवंटा
करील तुमचा चम्मनगोटा
म्हणून म्हणतो माझे ऐका—
"लग्न कांही करूं नका !" ३

"बंड्या बाहेर उभा आहे
कुल्यावरती पाणी घाला
बंबांत विस्तव विझला आहे
त्यात थोडे गोळे घाला
घुणंवाली आजारी आहे
धुणं तेवढं धुवून टाका
उभ्या उभ्या हातासरशी
झटकुन् झटकुन् वाळत टाका
शेजारणीशी बोलूं नका
उगाच फसकन् हंसूं नका
कारण नसतां 'वहिनी' म्हणून
गप्पा मिठ्ठास मारूं नका"
म्हणून म्हणतो माझं ऐका—
"लग्न कांही करूं नका !" ४

मतलबाचं नकली तूप
बदलून टाकिल तुमचं रूप
फायद्यापेक्षां तोटा खूप
संसाराचा जितका व्याप
तितका वाढेल मनस्ताप
नैराश्याचे फुटकें माप
झोप उडेल आपोआप
सौ. ची गुर्मी वाढत जाणार
उंदरासारखी शेपटी धरणार
तुमचा जीव खालीवर
डोकं खालीं पाय वर
तुमचं होईल शीर्षासन
म्हणून म्हणतो माझं ऐका—
"लग्न कांहीं करूं नका !" ५

¤¤¤

# असं आमचं ध्यान आहे

आमचं ध्यान भोळं आहे
डोळ्यानं तिरळं आहे
दिसायला काळं आहे
भालावरती चिंतेचेंही
भरमसाट जाळं आहे
बायको म्हणजे ह्यांच्यामते
मधाचं पोळं आहे
घरामधे तिळं आहे
त्यातलं एक खुळं आहे
आंबटलेल्या अन्नासारखं
जीवन सारं शिळं आहे
असं आमचं ध्यान आहे. —१

आमचं ध्यान गचाळ आहे
राहणीनं गबाळ आहे
घर म्हणजे डबक्यावरचं
साचलेलं शेवाळ आहे
बोलणं अगदी रटाळ आहे
अक्कल नेहमी गहाळ आहे
तोंडामधे भरपूर अशा
शिव्यांचाही सुकाळ आहे
हौसेचा तर दुष्काळ आहे
ह्यांच्या मते मी म्हणजे
खायला निव्वळ काळ आहे
असं आमचं ध्यान आहे. —२

आमचं ध्यान खवचट आहे
स्वभावानं तापट आहे
बोलण्यात मात्र चावट आहे
कितीही जपलं तरी बाई
वागणं अगदी तिरसट आहे
बारा महिने घरामधे
काही तरी कटकट आहे
दमडीसाठी रात्रंदिवस
तोंडाचीही वटवट आहे
आसुसलेला यांचा जीव
पैशासाठीं हावरट आहे
असं आमचं ध्यान आहे. —३

आमचं ध्यान बावळट आहे
दिसायला नेभळट जाहे
रंगानेही काळपट आहे
एक नंबरचं खुळचट आहे
कपडे सदा कळकट आहे
स्वभावाने घांदरट आहे
कचेरीतल्या कामाचं
गळचात नेहमी झंगट आहे
भांडणाची वेळ येताच
भित्रं आणि शेळपट आहे
बायकोसाठी मात्र सदा
एक नंबरचं लंपट आहे
असं आमचं ध्यान आहे. —४

आमचं ध्यान देखणं आहे
पोरींकडे बघून बघून
अजूनही खोकणं आहे
शेजारणीशी सदान् कदा
लाडे लाडे बोलणं आहे
घरातली बायको म्हणजे
हक्काचं खेळणं आहे
चूल मूल यांच्यासाठी
तिचं सदा राबणं आहे
असं आमच्या ध्यामाचं
तऱ्हेवाईक वागणं आहे
असं आमचं ध्यान आहे. —५

☼☼☼

# असे काही नवे नवे

असें कांही नवें नवें
आज अम्हांला हवें हवें ॥
वृत्त नको, प्रास नको
यमकांचाहि त्रास नको
शिळया कढीला ऊत नको
जांभुळलेली पहाट हवी
गाभुळलेली थंडी हवी
शद्वसृष्टिच्या जंजाळाला
चमत्कृतींची मेंदी हवी
एकच ध्यास, एकच आस,
असें कांही नवें नवें
आज अम्हांला हवें हवें—१

युगें युगें गाजलेली
रामायणाची कथा नको
तींच तींच पुराणांतील
शिळी वातुळ वांगीं नको
अहिल्या, सीता, सावित्रीची
जुनी पुराणी कहाणी नको
नव्या युगाची नवी कथा
नव्या कथेची नवी व्यथा
शेपटांवाचून वानर जसा
नव्या कथेचा शेवट तसा
असें कांही नवें नवें
आज अम्हांला हवें हवें—२

शब्दांवरती होऊन स्वार
नवकाव्याचा कुतुबमिनार
उंच उंच भिडवूं यार
अर्थाच्याहि सीमेपार
पिंगटलेली खिडकी म्हणू
बाभुळलेली चाळ म्हणू
झिंगटलेलीं कौलें म्हणूं
अर्थासाठीं शब्द नव्हे
भावनेसाठीं काव्य नव्हे
नवकाव्याचें रूप नवें
असें कांही नवें नवें
आज अम्हांला हवें हवें—३

हास्यासारखं हास्य नको
डोळ्यामध्यें भाव नको
चित्रांमध्यें अस्सलतेच्या
कलाकृतीचा गंध नको
डोळे, नाक, कान, गाल
सारं सारं चौकोनी
पतली पतली कमर जियेची
तीहीसुद्धां त्रिकोनी
भूमीतीच्या रेघोटयाचे
मॉडर्न आर्ट्‌सचें तंत्र नवें
असें कांहीं नवें नवें
आज अम्हांला हवें हवें—४

मेनकेची सोबत हवी
पावित्र्याचें नांव नको
रंभेची साद हवी
निर्व्याज असें प्रेम नको
अप्सरेची चव हवी
वनवासाचें नांव नको
पैंजणाची साथ हवी
संयमाची भाषा नको
रोज रोज भोग नवे
साध्य नवें, खाद्य नवें
असें कांहीं नवें नवें
आज अम्हांला हवें हवें—५

# एक काळ असा होता

एक काळ असा होता
वैभवाचा साज होता
खाऊन पिऊन मानवाच्या
जगण्यांत तेव्हां रंग होता ॥१॥

काळ आतां असा आहे
दांभिकतेला भाव आहे
गाल्हावरल्या कृत्रिम रंगा
सफरचंदी भाव आहे ॥२॥

एक काळ असा होता
बाजी रणांत लढत होता
लढ़तां लढतां घोडयावरून
कणसं तोडून खात होता ॥३॥

काळ आतां असा आहे
जीवनांत सारी दाटी आहे
लोकल्मध्यें लोंबकळतांना
"चणाय् गरम" खात आहे ॥४॥

एक काळ असा होता
पोलादाचं मनगट होतं
धडापासून शिर तुटलं
तरीहि मनगट लढत होतं ॥५॥

काळ अतां असा आहे
मनगटाला घडयाळ आहे
नऊ वीस – सहा फास्ट
यांत जीव जळतो आहे ॥६॥

एक काळ असा होता
चिरेबंदी वाडा होता
गाई म्हशी दारी होत्या
रतीब दुधाचा स्वस्त होता ॥७॥

काळ अतां असा आहे
राइसप्लेटला भाव आहे
फूटपाथच्या शय्येवरती
मानव आज घोरत आहे ॥८॥

एक काळ असा होता
चारित्र्याला मान होता
भगिनींच्या शीलासाठीं
समाज तेव्हां दक्ष होता ॥९॥

काळ अतां असा आहे
सिनेनटींची चलती आहे
डिंपल–राखी यांच्यासाठीं
तरुण आज पागल आहे ॥१०

एक काळ असा होता
तलवारीला धार होती
तलवारीच्या जोरावरती
विजयश्री नाचत होती ॥११॥

काळ अतां असा आहे
तलवार अमुचीं म्यान आहे
ओठावरल्या मिसरूडीला
तलवार कट् उरला आहे ॥१२

एक काळ असा होता
भोजनाचा थाट होता
सोनियाच्या ताटामधें
पूर्वज अमुचा जेवत होता ॥१३॥

काळ अतां असा आहे
स्टेनलेसस्टीलचं ताट आहे
रेशनच्या भातावरती
डालडयाची धार आहे ॥१४॥

एक काळ असा होता
कुठं कांही उणं नव्हतं
अन्नवस्त्र यांच्यासाठीं
कुठं कांहीं कमी नव्हतं ॥१५॥

काळ अतां असा आहे
उंदरासाठी घर आहे
पोटासाठी – वस्त्रासाठीं
मानव मात्र खंगत आहे ॥१६॥

☆☆☆

# आमचं नेमकं हसं होतं



बोरीबंदर स्टेशन येताच
आमची स्वारीं चालू लागते
गर्दी मध्ये कोणी सुन्दर
पाठमोरी युवती दिसते
बेल बॉटम, गुरु शर्ट
मानेवरती बॉबकट
अशी सुन्दर युवती बघून
आनंदाचे भरते येते
सभ्यतेचे नाटक करून
हळूच तिला धक्का देतो
तोच कर्कश आवाज येतो
"क्यो बे सुवर धक्का मारताय
क्यां हमको लडकी समजा
अंधा साला, गधा कहीका"
चक्क पुरुषी शब्द अैकून
आम्हालाही फेफरे येते
नको तिथं हमखासपणं
आमचं नेमकं हसं होतं—१

क्यू मधे थांबुन थांबुन
वैतागानं मन चिडतं
अखेर अेकदा केव्हातरी
बस मधे पाअुल पडतं
स्मार्ट फक्कड पोरगी बघून
आम्ही मुद्दाम तिथेच बसतो
तेवढीच जरा धुंद हवा
स्पर्शाचेही सुख घेतो
ऑफीसचाही विसर पडतो
वाटतं सुख संपूच नये
कचेरीचा स्टॉप तेवढा
लौकर म्हणून येअू नये
हाय! परंतु पुढच्याच स्टॉपला
फक्कड पोरगी उतरून जाते
नको तिथं हमखासपणं
आमचं नेमकं हसं होतं—२

बाहेर कुठे जमत नाही
म्हणून आम्ही खिन्न होतो
वैतागानं अखेर आम्ही
लग्नासाठी अुभे राहतो
वधूपित्यांची रांग लागते
पत्रिकांची रास पडते
छत्तीस गूण जुळणारी
अेक पत्रिका सांगून येते
वीणकाम-भरतकाम
सैंपाकातही भारीच सुगरण
'सुलोचना' हे नाम तियेचे
अैकुन खुलते अमुचे अंतर
आशेने मग अेके दिवशी
मुलगी पाहण्याचेही ठरते
चक्क तिरळा डोळा पाहून
आमचे अगदी आमलेट होते
नको तिथं हमखासपणं
आमचं नेमकं हसं होतं—३

बायकोलाही चकीत करावं
बेत मनाशी आम्ही करतो
घरी जाण्यासाठी म्हणून
ऑफीसातून लौकर निघतो
बाहेर निघताच सिनेमाची
दोन तिकीटे काढून घेतो
बकुळीच्या फुलांची अन्
अेक सुंदर वेणी घेतो
पायांनाही गती देऊन
आनंदाने घरी येतो
भले मोठे टाळे बघून
आमचा अगदी खिमा होतो
दार उघडून घरात जाताच
मेजावरती चिठ्ठी दिसते
'गडे ऽऽ किनई रात्रीपर्यंत
आईला मी भेटून येते'
नको तिथं हमखासपणं
आमचं नेमकं हसं होतं—४

☆☆☆

# कारण आम्ही कारकून आहोत

(१)

गालीं अमुच्या लाली नाही
जीवनांत कांही त्राण नाही
रामराज्यांत (?) कारकून होऊन
आमच्यांत तसा 'राम' नाही
गुऱ्हाळांतील चिपाडाहून
आमचीं स्थिती भिन्न नाही
आमच्यांत कांही दम नाही
कारण आम्ही कारकून आहोत

(२)

ऊठसूठ धांवपळ
आमच्या नशिबीं चुकली नाही
रामनाम, देवधर्म
हेंही हातून घडत नाही
आंघोळ, पाणी, दाढी, भोजन
धांवत धांवत गाठूं स्टेशन
नित्याचें हें रामायण
कारण आम्ही कारकून आहोत



(३)

आमच्या जगण्यांत 'काव्य' नाही
'कथानका'ला वाव नाही
वीरश्रीचा चुकून आम्ही
खोटा भाव मारीत नाही
साहेबावरती ठेवून भक्ती
चुकून केंव्हां मिळेल बढती
जगतो असल्या आशेवरती
कारण आम्ही कारकून आहोत

(४)

सेवन्टी फाइव्ह–टू ट्वेन्टी
ग्रेड आमुची फिक्स्ड् आहे
नऊ चाळीस, सहा फास्ट
गाडी अमुची फिक्स्ड् आहे
राव चढले, पंत पडले
आमचं काम फिक्स्ड् आहे
गप्पा त्याही फिक्स्ड् आहेत
कारण आम्ही कारकून आहोत

(५)

कर्मफळाची आस ठेऊन
आम्ही कधी जगत नाही
कामाच्या अन् ओझ्यानेहि
शिगरूं आमचं मरत नाही
रविवारची सुट्टी तीही
कधीं सुखानं भोगत नाही
दुःख त्याचं मानींत नाही
कारण आम्ही कारकून आहोत

(६)

आमचं जगणं उसनं आहे
ऐट सारी उसनी आहे
'अंदरकी बात राम जाने'
असा सगळा मामला आहे
पगाराच्या दिवसाविना
आम्ही कधी हंसत नाही
हंसणं धड साधत नाही
कारण आम्ही कारकून आहोत

(७)

पगार कधी पुरत नाही
सौ. ची भुणभुण थांबत नाही
बंड्या, खंड्या, चिंगी, ठकी
यांचा "आणा" संपत नाही
दूध, वाणी, शिंपी, न्हावी
यांचं देणं फिटत नाही
चिंता सरता सरत नाही
कारण आम्ही कारकून आहोत

¤ ¤ ¤




नटीच्या प्रेमात पडून
दिग्दर्शकाने केली
लग्नाची ऑफर
नटी म्हणाली
तुझ्या पेक्षा स्मार्ट आहे
माझा शोफर

☼ ☼ ☼

अेक नर्तिका
त्याच्या पुढयात
हलवीत आली कंबर
तो बिचारा घाबरून म्हणाला
'हॅलो, रॉंग नंबर'

☼ ☼ ☼

अेकदा अेका पोपटाने
खाल्ले डाळिंबाचे दाणे
नि चक्क गाऊ लागला
'माझे जीवन गाणे'

☼ ☼ ☼

एकदा अेका लेखिकेने
संपादकाला लिहिले
"तुम्ही फार छान आहात.
तुमच्यावर माझं प्रेम आहे,
सोबत कथा पाठवीत आहे
गडे तेव्हढी छापाल ना ?"
संपादकानं अुत्तर दिलं–
"सुरवात छान जमली आहे
मध्य उत्तम साधला आहे
शेवट तेवढा घसरल्याने
कथा परत पाठवीत आहे"

☼ ☼ ☼

अेका सिग्नलानं
गाडीला घातला डोळा
अन् लाजत लाजत
गाडीनं चक्क सांधा बदलला

☼ ☼ ☼

अेकदा अेका कोंबडीनं
घातली डझनभर अंडी
कोंबडा म्हणाला लाडे लाडे
घेणार का थोडी ब्रँण्डी

¤ ¤ ¤

तो तिला म्हणाला–
"गडे, जरा जवळ ये ना"
पिंजऱ्यातला पोपट
तेवढ्यात म्हणाला–
"अिश्यऽऽ बाबा बघतिल ना"

¤ ¤ ¤

अेकदा अेका स्कूटरनं
ट्रकला दिली धडक
ट्रक म्हणाला हासत हासत
"साली भारीच दिसतेय कडक"

¤ ¤ ¤

गुलाबी गाल, सुंदर डोळे
नार दिसते कवळी
वाअिट फक्त अेकच आहे
दातांची लावते कवळी

¤ ¤ ¤

तो: साला माल तर आहे कंडा
ती: मवाली मेला, दिसतोय
भारीच थंडा

¤ ¤ ¤

"लाडके प्रिये
मी आहे कवी"
किंचाळतच ती म्हणाली–
"आई गऽऽ
मेला देतोय मला शिवी."

¤ ¤ ¤

आज गड्या आपलं लंघन
कारण...
कारण प्रेयसीनं दिलय्
स्वप्नात मला चुंबन

¤ ¤ ¤



# काही विनोदी (सटवा) शेर

◇ तू रागावतेस आणि तुझ्या गालावर चढते लाली
आणि मग निमूटपणे, मीच करतो घरकामाची हमाली

◇ तुझ्या केसांचा शेपटा रुळतो नितंबावर
पण सांग ना सखे त्यात गंगावनाची कितीशी भर ?

◇ लिपस्टिकचे लाल लाल ओठ, भुवया तशात वक्राकार
दीडशे पौंडाचा घेर तुझा, सगळाच आहे हाहा:कार

◇ तुला पाठमोरी पाहण्यात मी स्वतःला धन्य मानतो
कारण तुझा मुखचंद्रमा पाहताच अॅस्प्रो घेण्याचा त्रास होतो

◇ खूप खूप विचार केला तू अशी मंदमधुर का हसतेस ?
आणि ध्यानात आलं, किडक्या दातांची तूच धास्ती घेतेस

◇ अज्ञानात सुख आहे असं कुणीसं म्हटलं आहे
तुझ्याशी लग्न केल्यापासून हें मला पटलं आहे

◇ पाच मुलांची आई झालीस तरी तू नटतेस मुरडतेस
मी आपला छान म्हणतो कारण एकदम तू आग बनतेस

◇ तू गातेस आणि मी आनंदाने मोहरून जातो
कारण भांडणाविना तेवढाच वेळ जरा तरी बरा जातो

◇ शेजारीण सुंदर असूनही मी तुलाच सुंदर म्हणतो
कारण रात्रंदिवस तुझ्याबरोबर जीव मला जगवायचा असतो

◇ हरणासमान सुंदर डोळे त्यात काळेभोर अंजन
पण दातांनाच सांग गडे का लावीत नाहीस दंतमंजन

◇ तुझ्या डोईतल्या सुगंधी मोगऱ्यानं मी मोहरून गेलो
त्या मोहात तुझा मुखडा पाहण्याचं साफ विसरूनच गेलो

◇ तू म्हणालीस 'केलेल्या पापांचे कसे करू क्षालन?'
मी म्हटलं 'कर माझ्या शंभर कवितांचे वाचन'



# मरावे परी कीर्तिरूपे उरावे

इहलोकीची यात्रा करुनी, गुंड्याभाऊ गेला वरती
कुणी बोलिले हळूच तेव्हा, मागे उरली त्याची कीर्ती

आश्चर्याने मूढ होउनी, वदलो मी मग कसली कीर्ती ?
पत्ते, दारु, यांच्या पायी, आयुष्याची केली माती

हळूच बोले मग ती व्यक्ती, होय तयाची झाली माती
मागे उरली त्याची पत्नी, नाव तियेचे आहे "कीर्ती"

☆☆☆

# म. पां. भावे

– यांची प्रकाशित पुस्तके –

- आपला देश, आपलं वागणं
- श्रीगीतकृष्णायन
- भंपकपुरीचा फेरफटका (लोकनाट्य)
- असा मी काय गुन्हा केला? (कादंबरी)
- अचूक निवड (बालवाङ्मय)
- श्रीरामकृष्ण संगीत कथा (रामकृष्ण परमहंसांचे गीतमय चरित्र)
- अबोली (कथासंग्रह)
- मसाला पान (विनोदी कविता)

## आगामी

- स्वप्न तू विसरून जा (कादंबरी)
- चांदणे अंधारले (कादंबरी)

REFBK-0021501
REFBK-0021501
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वि०क्र. २२९६
२९५०९
३१०५